# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

## Date – 10 August 2024

## Time 18.10 to 18.20

## Language Marathi

## आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर

## प्रादेशिक बातम्या

## दिनांक – १० ऑगस्ट २०२४ सायंकाळी ६.१०

****

- बँकिंग क्षेत्रात सरकारकडून बहुप्रतिक्षित सुधारणा–केंद्रीय अर्थमंत्र्यांचं प्रतिपादन
- रस्त्यावरचे खड्डे बुजवण्यासाठी “लिओ पॉलिमर तंत्रज्ञान” वापरण्याची मुख्यमंत्र्यांची सूचना
- राजकीय स्वार्थासाठी राज्यात जातीय द्वेष–राज ठाकरे यांच्याकडून खंत व्यक्त
- प्रसिद्ध अभिनेते विजय कदम यांचं दीर्घ आजाराने निधन

आणि

- राज्य सरकारची लाडकी बहीण योजना फसवी असल्याची काँग्रेसची टीका

****

बँकिंग क्षेत्रात सरकारकडून बहुप्रतिक्षित सुधारणा राबवल्या जात असल्याचं प्रतिपादन केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी केलं आहे. त्या आज रिझर्व्ह बँकेच्या मध्यवर्ती संचालक मंडळाशी संवाद साधत होत्या. बँकिंग नियमन सुधारणांची दीर्घ काळापासून गरज होती असं त्यांनी सांगितलं. बँकांनी आपल्या व्यवहारात कोअर बँकिंगवर लक्ष केंद्रित करण्याच्या आवश्यकतेवर अर्थमंत्र्यांनी भर दिला.

****

रस्त्यावरचे खड्डे बुजवण्यासाठी “लिओ पॉलिमर तंत्रज्ञान” वापरण्याच्या सूचना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी संबंधित अधिकाऱ्यांना काल दिल्या. ठाणे नाशिक महामार्गावरच्या खारेगाव ते पडघा, तळवली ते शहापूर या रस्त्याची पाहणी केल्यानंतर ते बोलत होते. या महामार्गावरची प्रलंबित कामं तातडीनं पूर्ण करावी तसंच कामात अडथळा आणणाऱ्यांवर फौजदारी कारवाई करावी असं मुख्यमंत्र्यांनी

प्रशासनाला सांगितलं. कामं करताना वाहतूक कोंडी होऊ नये याकरता सुयोग्य नियोजन करण्याच्या सूचनाही त्यांनी दिल्या.

****

नार-पार-गिरणा नदीजोड प्रकल्पाला महाराष्ट्राचे राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांनी मंजुरी दिली आहे. ७ हजार १५ कोटी रुपयांच्या या योजनेतून पश्चिमी वाहिनी नार-पार-गिरणा या नदीखोऱ्यातून १० पूर्णांक ६४ शतांश टीएमसी पाणी वापर प्रस्तावित आहे. या योजनेमध्ये ९ धरणं प्रस्तावित आहेत. त्यातून २६० पूर्णांक ३० दशलक्ष घन मीटर पाणी उपसा करुन चणकापूर धरणाच्या पाणलोट क्षेत्रात सोडण्यात येणार आहे. यामुळे नाशिक जिल्ह्यातल्या सुरगाणा, कळवण, देवळा, मालेगाव आणि जळगाव जिल्ह्यातल्या चाळीसगाव, पारोळा, भडगाव तालुक्यांतल्या एकूण ४९ हजार ५१६ हेक्टर क्षेत्राला लाभ होणार आहे.

****

माजी गृहमंत्री अनिल देशमुख यांनी भाजप नेते तसंच तत्कालीन विरोधी पक्षनेते देवेंद्र फडणवीस यांना अटक करण्यासाठी आपल्यावर दबाव आणला होता, असं मुंबईचे माजी पोलिस आयुक्त परमवीर सिंग यांनी म्हटलं आहे. परमबीर सिंग यांच्या या विधानाला उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दुजोरा दिला आहे. ते आज नागपुरात प्रसारमाध्यमांशी बोलत होते. हे आरोप लावण्याबाबतचे ध्वनिचित्रफितीचे पुरावे सुद्धा केंद्रीय अन्वेषण विभागाला सादर केल्याचं फडणवीस यांनी सांगितलं.

****

राजकीय स्वार्थासाठी राज्यात जातीय द्वेष पसरवला जात असल्याची खंत महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांनी व्यक्त केली. ते आज छत्रपती संभाजीनगर इथं नवनिर्माण यात्रेच्या समारोपानंतर पत्रकार परिषदेत बोलत होते. उपलब्ध संधीचा योग्य वापर केल्यास राज्यात आरक्षणाची गरज नाही असं सांगत आर्थिक निकषांवर आरक्षण देण्याच्या मागणीचा ठाकरे यांनी यावेळी पुनरुच्चार केला. ते म्हणाले –

> ***महाराष्ट्र राज्यासारखं राज्य मला अस वाटतं हिंदुस्थानात दुसरं कुठलं राज्य नाही आहे. या राज्यामध्ये शिक्षणापासून ते नौकऱ्यापर्यंत, उद्योग – धंद्यांपर्यंत इतक्या गोष्टी इथे उपलब्ध असतांना बाहेरच्या राज्यांमधल्या लोकांना इथे सगळ्या गोष्टी मिळतात. पण आमच्या मुलींना मुलांना इथे मिळत नाहीत त्या ज्या महाराष्ट्रामधल्या जो कोटा***

***आहे महाराष्ट्रातील ज्या काही गोष्टी उपलब्ध आहेत या जर समजा आपण नीट वापल्या महाराष्ट्रातील मुलामुलीसाठी, मराठी मुलामुलींसाठी तर आपल्याला खरं तर आरक्षणांची गरज नाही.***

****

छत्रपती संभाजीनगर शहरानजिक नक्षत्रवाडी इथल्या प्रधानमंत्री आवास योजनेतंर्गत गृह प्रकल्पाचं गृहनिर्माण मंत्री अतुल सावे यांच्या हस्ते आज भूमिपूजन झालं. या प्रकल्पाचं बांधकाम अत्याधुनिक तंत्रज्ञानाने करण्यात येणार असल्याने, संपूर्ण प्रकल्प दीड ते दोन वर्षात पूर्ण होईल, असा विश्वास, सावे यांनी यावेळी व्यक्त केला. या प्रकल्पाअंतर्गत सुमारे साडे सहा हेक्टर क्षेत्रावर १ हजार छपन्न सदनिका बांधण्यात येणार आहेत. दरम्यान, जिल्ह्यात सांडपाणी व्यवस्थापनासाठी दोनशे कोटी रूपयांचा निधी मंजूर करण्यात आला असल्याची माहिती आमदार संजय शिरसाट यांनी यावेळी दिली.

****

मराठी सिनेसृष्टीतले प्रसिद्ध अभिनेते विजय कदम यांचं आज मुंबईत त्यांच्या राहत्या घरी निधन झालं. ते ६७ वर्षांचे होते. गेल्या दीड वर्षांपासून ते कर्करोगाने त्रस्त होते. विजय कदम यांनी मराठी नाटकं, चित्रपट तसंच दूरदर्शन मालिका अशा तीनही माध्यमांमधून अनेक वर्ष काम केलं. त्यांनी भूमिका साकारलेलं ‘विच्छा माझी पुरी करा’ हे लोकनाट्य, तसंच ‘चष्मेबहाद्दर’, ‘पोलिसलाईन’, ‘हळद रुसली कुंकू हसलं’, ‘आम्ही दोघं राजा राणी’ आदी चित्रपटही खूप गाजले. विजय कदम यांच्या पार्थिव देहावर आज अंधेरीत अंत्यसंस्कार करण्यात येत आहेत.

****

राज्य सरकारची लाडकी बहीण योजना फसवी असल्याची टीका काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी केली आहे. आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर लातूर, धाराशिव आणि बीड जिल्ह्यातल्या काँग्रेस कार्यकर्त्यांचा मेळावा आज लातूर इथं पार पडला, त्यावेळी पटोले बोलत होते. काँग्रेसचे राज्य प्रभारी रमेश चेन्निथला, आमदार अमित देशमुख यांच्यासह अनेक मान्यवर यावेळी उपस्थित होते. यावेळी मराठवाड्यातले काँग्रेसचे नवनिर्वाचित खासदार डॉ. शिवाजी काळगे, वसंतराव चव्हाण आणि कल्याण काळे यांचा सत्कार करण्यात आला. विरोधी पक्ष नेते विजय वडेट्टीवार यांनीही यावेळी सत्ताधारी पक्षांवर जोरदार टीका केली.

****

नांदेड जिल्ह्यातल्या मुखेड तालुक्यात आज राज्यस्तरीय मातंग समाज मेळावा घेण्यात आला. अण्णाभाऊ साठे संशोधन आणि प्रशिक्षण संस्था–आर्टी ची स्थापना केल्याबद्दल मातंग समाजाच्यावतीनं शासनाचे आभार व्यक्त करण्यात आले. यावेळी राज्य उत्पादन शुल्क मंत्री शंभूराज देसाई यांचा सत्कार करण्यात आला. आरक्षणाचाही प्रश्न लवकरच निकाली निघेल. मातंग समाजाच्या सर्व प्रलंबित मागण्या पूर्ण करण्यासाठी शासन सकारात्मक असल्याचं देसाई यांनी यावेळी सांगितलं. आरक्षण विषयक अंतर्गत वर्गवारी न्यायालयाच्या निर्देशानंतर पूर्ण केली जाईल असंही देसाई यांनी सांगितलं.

****

धाराशिव जिल्ह्याच्या परांडा तालुक्यात मौजे बावची इथं पालक मंत्री तानाजी सावंत यांच्या उपस्थितीत हर घर तिरंगा उपक्रमाचा आज शुभारंभ करण्यात आला. यावेळी शालेय विद्यार्थी आणि उमेद महिला स्वयंसहायता गटातील महिलांनी तिरंगा रॅली काढली. या वेळी झालेल्या कार्यक्रमात उपस्थित नागरिकांनी सामूहिक तिरंगा प्रतिज्ञा घेतली. तसेच, गावातल्या माजी सैनिकांचा सत्कार करण्यात आला.

****

लातूर जिल्ह्यात हर घर तिरंगा अभियानांतर्गत आज विविध शाळांमध्ये निबंध स्पर्धा घेण्यात आली. यावेळी विद्यार्थांनी भारतीय स्वातंत्र्य लढ्यातील विविध घटनांवरील विषयांवर निबंध सादर केले. जिल्हा परिषद शाळांसह विविध शाळांमधील विद्यार्थी या स्पर्धेत सहभागी झाले.

****

पॅरिस ऑलिम्पिक स्पर्धेत भारतीय महिला कुस्तीपटू रितिका हुड्डा हिला उपांत्यपूर्व फेरीत किरगिझस्तानच्या कुस्तीपटूकडून पराभव पत्करावा लागला. भारताने आतापर्यंत या स्पर्धेत एक रौप्य आणि पाच कांस्य पदकांसह एकूण सहा पदके जिंकली आहेत. उद्या या स्पर्धेचा समारोप होत आहे.

दरम्यान, ऑलिम्पिक स्पर्धांमध्ये पदक विजेत्या भारतीय खेळाडूंचा आज पॅरिसमध्ये इंडीया हाऊस इथं सत्कार करण्यात आला. यावेळी ऑलिम्पिक संघटनेच्या सदस्य नीता अंबानी, भारतीय ऑलिम्पिक संघटनेच्या अध्यक्ष पी. टी. उषा यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

****

छत्रपती संभाजीनगर इथं आज आपत्ती व्यवस्थापन जनजागृती मिनी मॅरेथॉन घेण्यात आली. मदत आणि पुनर्वसन विभाग आणि जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण यांच्यावतीनं घेण्यात आलेल्या या मॅरेथॉनला गारखेडा इथल्या संत गजानन महाराज मंदिरापासून प्रारंभ होऊन विभागीय क्रीडा संकुलात तिचा समारोप झाला.

****

परभणी महसूल विभागामार्फत महसूल पंधरवाड्यामध्ये `सैनिक हो तुमच्यासाठी` हा कार्यक्रम जिल्हाधिकारी रघुनाथ गावडे यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हा नियोजन सभागृहात घेण्यात आला. हुतात्मा सैनिकांच्या वीर पत्नी आणि वीर माता-पिता यांचा मान्यवरांच्या हस्ते शाल आणि श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला. तसंच सैनिक कल्याण विभागाव्दारे माजी सैनिक, विधवा पत्नी यांच्या पाल्यांना शिक्षणासाठी मदत, शिष्यवृत्ती, आर्थिक मदतीचे धनादेश देण्यात आले

****

लातूर शहरात कृषि तंत्रज्ञान व्यवस्थापन यंत्रणेअंतर्गत १५ तारखेला कल्पतरु मंगल कार्यालयात रानभाजी महोत्सवाचं आयोजन करण्यात येणार आहे. या महोत्सवात रानभाज्या तसंच रानफळांची तांत्रिक माहिती आणि पाककृती यांची सचित्र माहिती देण्यात येणार आहे. याठिकाणी शेतकऱ्यांनी आपल्या शेतातल्या रानभाज्या आणि रानफळं विक्रीसाठी घेऊन येण्याचं आवाहन प्रकल्प संचालक एस. व्ही. लाडके यांनी केलं आहे. तालुकास्तरावर कालपासूनच या महोत्सवाला सुरूवात झाली आहे.

****

छत्रपती संभाजीनगर शहरानजीक भांगसी माता गडावर विविध विकासकामांसाठी दोन कोटी रुपये निधी मंजूर करण्यात आला आहे. जिल्ह्याचे पालकमंत्री अब्दुल सत्तार यांनी ही माहिती दिली. भांगसी माता गडाच्या विकासासाठी निधीची कमतरता भासू देणार नाही, असं आश्वासन सत्तार यांनी दिलं.

****

आषाढी एकादशीनंतर पंढरपूर इथून निघालेली संत श्री गजानन महाराजांची पालखी आज बुलडाणा जिल्ह्यात खामगाव इथं पोहाचली. यावेळी पालखीच्या दर्शनासाठी भाविकांनी गर्दी केली होती. ही पालखी उद्या पहाटे शेगावकडे मार्गस्थ होणार आहे.

****